# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दक्षिण सोलापूर मतदार संघात रास्त भाव धान्य दुकानात रॉकेल व धान्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याबाबत**

**(१) ११९२१ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर मतदारसंघात रास्त भाव धान्य दुकानातून पुरेशा प्रमाणात रॉकेल व धान्य उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्याच्या आवश्यकतेच्या २८ टक्के इतके केरोसिन नियतन उपलब्ध करुन दिले आहे. उपलब्धतेच्या प्रमाणानुसारच शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरित करण्यात आले आहे. राज्याच्या केरोसिन कोटयात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यात प्राधान्य कुटुंबाच्या व अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना/ शिधापत्रिकाधारकांना विहित परिमाणानुसार अन्नधान्य वाटप करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाच्या मार्च २०१० मधील आदेशाप्रमाणे राज्यात सन २०११ साली दारिद्रयरेषेखालील जनगणना करण्याबाबत**

**(२) ११९६४ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाच्या मार्च २०१० मधील आदेशाप्रमाणे राज्यात सन २०११ साली दारिद्रयरेषेखालील जनगणना करण्यात आली आहे, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, उक्त जनगणना पूर्ण झाली आहे काय व त्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील किती कुटुंबे आढळून आली,

(३) तसेच,जनगणना पूर्ण झाली नसल्यास सर्वसाधारण कारणे काय आहेत व जनगणना पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व प्राप्त प्रश्नावलीनुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करण्यात येत आहे. आता या प्रक्रियेतील प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सर्वेक्षणाची प्रारुप यादी प्रसिध्द करणे व त्याबाबतचे दावे व आक्षेप निकालात काढणे इ. प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार ३१ जिल्ह्यांमध्ये दावे व आक्षेप प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये प्रारुप यादी प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यांनतर या माहितीची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदरील अंतिम यादी केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर केंद्र शासनाकडून राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे निश्चितीकरण होणार आहेत.

---

**कामोठे, पनवेल, (जि.ठाणे) येथील सेक्टर नं. ११ मधील धर्मराज ज्वेलर्सच्या दुकानातून चोरांनी ५० लाखांचा ऐवज लुटल्याबाबत**

**(३) ११९७७ (०६-०४-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे, पनवेल, (जि.ठाणे) येथील सेक्टर नं. ११ मधील धर्मराज ज्वेलर्सच्या दुकानातून रूपये ५० लाखांचा ऐवज दि. २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास चोरट्यांनी लुटला असून चोरांना अद्याप पकडण्यात आले नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) सदर प्रकरणी कामोठे पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१६/२०१५, भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासाअंती सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपींचा समावेश असल्याचे आढळून आले. त्यामधील २ आरोपींना अटक करण्यात आली असून २ आरोपी फरार असून ते झारखंड येथे राहणारे आहेत. त्यांचा शोध चालू आहे.

चोरीस गेलेल्या रु.२८,४८,८१२/- किंमतीच्या सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांपैकी अटक आरोपींकडून रु.६,६९,५९०/- किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे. सदर प्रकरण पोलीस तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील धनकवडी परिसरात वाहनांचे मोठ्याप्रमाणात नुकसान करण्यात आल्याबाबत

**(४) १२०११ (०६-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील धनकवडी परिसरात बालाजीनगर येथे पार्क केलेल्या १० दोन चाकी गाड्या पेटवून दिल्याचे व चव्हाणनगर परिसरामध्ये रस्त्याच्या कडेला पार्क करण्यात आलेल्या १२ वाहनांच्या काचा फोडून वाहनांचे मोठ्याप्रमाणात नुकसान करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा घटना धनकवडी परिसरात वारंवार होत असतांना खबरदारी म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) होय.

(२) श्री.अनिकेत पांडुरंग गायकवाड यांनी धनकवडी, पुणे येथे ॲक्टीव्हा मोटरसायकल पार्क करुन ठेवली असता दिनांक १५ जानेवारी, २०१५ रात्री ९ वा ते सकाळी २ वा चे दरम्यान अज्ञात इसमांनी मोटरसायकलला आग लावली व त्यात एकूण १० दुचाकी गाड्या जळून रु. २,८७,०००/- चे नुकसान झाले. या घटनेसंबंधात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५/२०१५ भा.दं.वि कलम ४३५, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तपासाअंती एकूण ४ आरोपीना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

रशिद रिजाउद्दीन इनामदार यांनी त्यांची टेम्पोट्रॅव्हलर व मारुती इको त्यांच्या बंगल्यासमोर पार्क करुन ठेवली असता दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१५ रोजी अज्ञात इसमांनी सदर गाड्यांच्या काचा व त्या गाडीच्या बाजूला पार्क केलेल्या इतर वाहनांच्या अशा १४ पाहनांच्या काचा लोखंडी गजाने फोडून रु. १८,५०० चे नुकसान झाले. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २७/२०१५ भा.दं.वि. कलम २९०, ४२६, ४२७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट क्र. ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

वरील सर्व आरोपींचे विरूध्द फौजदारी दंडप्रक्रिया संहिता कलम १०७ नुसार प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून सोसायटीच्या पार्कींगच्या जागा, सार्वजनिक ठिकाणी पार्क करण्यात येणारी वाहने यांचे नुकसान होवू नये म्हणून निरनिराळया सोसायट्यांचे चेयरमन, नागरिक, वॉचमन या सर्वांसोबत पोलीस स्टेशन येथे वेगवेगळया बैठकांचे आयोजन करण्यात येते व त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. तसेच दिवसा व रात्री पोली अधिकारी व कर्मचारी यांची नियमित गस्त नेमण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली तालुक्यातील (जि.पुणे) राखीव वनक्षेत्रात**
**मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याबाबत**

**(५) १२०१३ (०६-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली तालुक्यातील (जि.पुणे) मौजे बुर्केगाव, डोंगरगाव, लोणीकंद, फलगाव, भावडी व डूडळगाव येथे राखीव वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वनक्षेत्राच्या भोवताली असणा-या हद्दीच्या खुणा नष्ट केल्याचे आढळत आहे, हे खरे आहे काय,

(३) सदरच्या अतिक्रमाणामुळे वनक्षेत्रातील वन्यप्राणी वनक्षेत्र सोडून इतर खाजगी शेती पिकांचे नुकसान करीत आहेत, हे खरे आहे काय,

(४) वन विभागाच्या संबंधित सर्व स्तरावरील अधिका-यांशी वारंवार ग्रामस्थांनी पाठपुरावा करुन सुध्दा कोणतीही कारवाई करीत नाही, हे खरे आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१५)** :(१) हे अंशतः खरे आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मौजे बुर्केगाव, डोंगरगाव, लोणीकंद फलगांव भावडी व डुडुळगाव येथील वनक्षेत्र महसूल विभागाच्या ताब्यातून सन २००९ साली वन विभागाकडे जुन्या अतिक्रमण क्षेत्रासह हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. वनक्षेत्राचा सर्व्हे तालुका भूमी अभिलेख व विभागीय वन सर्व्हेअर यांच्याकडून करुन घेण्यात आला असून त्यांनी नवीन सर्व्हेप्रमाणे सिमेंट पिलर्स लावण्यात आलेले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही. वनक्षेत्रातील वन्यप्राणी वनक्षेत्र सोडून इतर खाजगी शेती पिकांचे नुकसान करीत असल्याचे आढळून आले नाही. तसेच नव्याने केलेले अतिक्रमण निर्दानास येताच शक्य तेथे अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे. जुन्या अतिक्रमणाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत.

---

## पुणे जिल्हयातील खडकवासला मतदारसंघात उत्तमनगर व धायरी परिसरामध्ये दुकानांमध्ये तोडफोड करण्यात आल्याबाबत

**(६) १२०१६ (०७-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला मतदारसंघात माहे जानेवारी मध्ये उत्तमनगर व धायरी परिसरामध्ये दुकानांमध्ये तोडफोड करण्यात आली,तसेच अशा घटना वारंवार घडत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस प्रशासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) नाही.

खडकवासला मतदारसंघातील उत्तमनगर व धायरी परिसरात दुकानांमध्ये तोडफोड झाल्याबाबत फक्त दोनच गुन्हे दाखल झाले आहेत.

(२) (१) अचानक चौक, शिवणे येथील लक्ष्मी स्वीट होम या दुकानात दोन इसमांनी कॅशीयरला शिवीगाळ करुन नाश्ता काऊंटरचे व मिठाई काऊंटरचे काचेवर दगड मारुन रु.१ लाखाचे नुकसान केले व गल्ल्यातील रु.५,०००/- जबरदस्तीने काढून घेवून ते पळून गेले. या प्रकरणी वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२८/२०१५, भा.दं.वि. कलम ३९२, ४२७, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपींकडून गल्ल्यातून चोरुन नेलेल्या रु.५,०००/- पैकी रु.३,०००/- जप्त करण्यात आले आहेत.

(२) श्री.सतराराम रताराम चौधरी, गणेशनगर, धायरी यांच्याकडे ३ इसमांनी दारु पिण्यासाठी पैसे मागितले असता त्यांनी ते दिले नाहीत म्हणून त्यांच्या ममता स्वीट्स व आरी स्वीट्स, धायरी फाटा, पुणे या दुकानांवर दगडफेक करुन रु.१,४५,०००/- एवढे नुकसान केले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र..४३/२०१५, भा.दं.वि. कलम ३८५,४२७,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वरील दोन्ही गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील खडकवासला धरणातील गाळाबाबत

**(७) १२०१७ (०६-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला धरणात "मेरी" या संस्थेच्या अहवालानुसार धरणाच्या तळाशी २ टीएमसी गाळ साचला आहे असे वर्तविण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या परिसरात पाऊस पडल्यास धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणी साठवण्यास जागाच शिल्लक रहात नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच खडकवासला धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने दुसऱ्याच दिवशी धरण परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते, हे खरे आहे काय,
(४) उक्त प्रकरणी संबंधित विभागाकडून काही कार्यवाही करण्यात आली काय, असल्यास कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.मेंदडी (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील श्रीमती स्वाती शरद पाबरेकर यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत**

**(८) १२०७६ (०७-०४-२०१५). श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मु.मेंदडी (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील उपकेंद्र वारळ येथे नर्स म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती स्वाती शरद पाबरेकर हीचा दिनांक ४ एप्रिल, २०१४ रोजी वा त्या सुमारास संशयास्पद मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत नर्सच्या वडिलांनी संशयीत आरोपीच्या विरोधात म्हसळा पोलीस ठाणे येथे माहे एप्रिल, २०१४ मध्ये अनेकवेळा पोलीसांत लेखी तक्रार करुन सुध्दा कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी पोलीसांनी कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) :** (१) मृत्यू झाला हे खरे आहे. परंतु संशयास्पद मृत्यू झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) होय.

मृत नर्सच्या वडिलांनी म्हसळा पोलीस ठाणे येथे ३ व्यक्तीविरुध्द तक्रार अर्ज केले आहेत.तथापि, अर्जदार यांनी वेळोवेळी तक्रार केल्यानंतर त्यांना पोलीसांनी फिर्याद देण्यास सांगितले असता त्यांनी फिर्याद दिली नाही.

जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांचा शवविच्छेदन अहवाल, केमिकल अनालायझर, मुंबई यांचा व्हिसेरा रिपोर्ट, ग्रॅन्ड मेडिकल कॉलेज आणि सर जे.जे समूह रुग्णालय, मुंबई यांच्याकडील पॅथॉलॉजी रिपोर्ट यांना दिलेल्या दस्तऐवज व कागदपत्रांची तपासणी केली असता श्रीमती स्वाती शरद पाबरेकर यांच्या मृत्यूचे कारण त्यांचे रक्त, लिव्हर, किडनी प्लीहा इत्यादीमध्ये क्लोरोक्वीनची पातळी टॉक्सीक लेव्हल पेक्षा खुपच असल्याचे आढळून आल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे, असे आढळून आले आहे.

---

**राज्यात सौरऊर्जेवर चालणारे कृषीपंप बसविण्याबाबत**

**(९) १२०८८ (०४-०४-२०१५). श्री. संतोष दानवे (भोकरदन), ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौरऊर्जेवर चालणारे कृषीपंप बसवल्यास कृषीपंपाच्या वीजवापराचा उद्योगांवरील भार हळूहळू कमी होईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच अश्वशक्तीच्या एका पंपाची किंमत सुमारे पाच लाख रुपये असून वर्षाला पाच लाख पंप बसवासचे असल्यास २५ हजार कोटी रुपयांची गरज असून त्यापैकी राज्य शासनाला ३०% वाटा म्हणजे ७५०० कोटी रुपये लागणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कधीपर्यंत राबविण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१५) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर १ लाख नग सौर कृषि पंप योजनेसाठी रु. ४००.०० कोटी एवढी तरतूद घोषित केली आहे त्याअंतर्गत राज्यासाठी ७५४० नग सौर कृषि पंपांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यासाठी, अंदाजित खर्च रु.४४५.०१ कोटी अपेक्षित आहे. त्यापैकी, राज्य शासनाने अनुदान ५% म्हणजेच रु.२२.२५ कोटी आहे.

(३) सदर पथदर्शी योजना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राबविण्यात यावयाची आहे.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे सन २००८ पासुन मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालया सुरु करण्यास शासनाने शासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान केल्याबाबत**

**(१०) १२०९६ (०४-०४-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे सन २००८ पासुन मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालया सुरु करण्यास शासनाने प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान केली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयात सोई सुविधा उपलब्ध नसल्याने हे महाविद्यालय पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीत सुरु करावे तसेच दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय वरुड (पुसद) जि.यवतमाळ येथून शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरते स्वरुपात घ्याव्यात असे सूचित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, सदर महाविद्यालयाकरिता शासनाने निधी मंजूर केला आहे काय, वा करण्यात येणार आहे काय असल्यास किती निधी मंजूर करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, उपलब्ध सोई सुविधा ग्राह्य धरुन अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(४) दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय वरुड (पुसद) जि.यवतमाळ येथून शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात घेण्धत आल्या आहेत.

(५) सदर महाविद्यालय पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने सन २००८-०९ ते २०१४-१५ या कालावधी मध्ये विद्यापीठाच्या मागणी प्रमाणे रु.३२४.६४ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

तसेच सद्यस्थितीत सदर महाविद्यालय पुढे चालू ठेवण्यासाठी शा.नि. दि. ३ मार्च, २०१४ अन्वये ३७ शिक्षक व शिक्षकेत्तर नवीन पदे निर्मितीसह १८ पदांचे काम बाह्यस्त्रोस्तराद्वारे करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच महाविद्यालयाची स्वतःची स्वतंत्र इमारत, प्रोगशाळा, मुलांसाठी वसतिगृह, यंत्रसामुग्री, इ.सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी रु. ५७५८.०७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून ५ वर्षे टप्याटप्याने विद्यापीठाच्या मागणी नुसार उपलब्ध करण्यात येणार आहे.

---

**जिल्हा परिषद सांगलीच्या इमारत व परिसरामधील जागा विना मोबदला वापरुन जिल्हा परिषद स्वीय निधीचे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडविल्याबाबत**

**(११) १२१०३ (११-०५-२०१५). श्री. धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सांगलीच्या इमारत व परिसरामधील जागा विना मोबदला वापरुन शासकीय कार्यालये व कर्मचा-यांच्या संस्था यांनी जिल्हा परिषद स्वीय निधीचे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडविल्याबाबतची माहिती माहे जानेवारी, २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीतावर काय कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच, त्याची सद्यस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) होय, अशंतः खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हा परिषदेच्या इमारत व परिसरात एकूण १५ कार्यालयाचे असून त्यापैकी ५ कार्यालये जिल्हा परिषदेशी संबंधित असून त्याचे मासिक भाडे दरमहा स्वानिधी जमा होते.

उर्वरित कार्यालयाचे जिल्हा परिषदेच्या काही विभागाशी संबंधीत असणारी शासकीय कार्यालये व कर्मचारी तपसंस्था आहेत. ही कार्यालये कार्यान्वित झालेपासून आज अखेरचे भाडे स्वनिधीमध्ये भरणेबाबत संबंधित कार्यालयाना कळविले असून भाडे वसूल करणेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

### सांगली जिल्हामधील जिल्हा परिषद पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना पुरवठा करण्यात आलेल्या युपीएस मध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) १२१०६ (०८-०४-२०१५). श्री. धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हामधील जिल्हा परिषद पंचायत समित्या, व ग्रामपंचायतींना पुरवठा करण्यात आलेल्या युपीएस मध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, संबंधीतावर काय कार्यवाही करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) होय. युपीएस पुरवठादारांनी विहीत क्षमतेपेक्षा कमी दर्जाच्या युपीएसचा पुरवठा केल्याचे माहे ऑगस्ट २०१४ च्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले.

(२) होय.

(३) संबंधीत युपीएस पुरवठादार केंद्रशासनाच्या दरकारारावर असल्याने (DGS&D) त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत शासन पत्र दि.३० ऑगस्ट, २०१४ अन्वये संचालक, पूर्ति तथापि निपटान महानिदेशालय, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे. तसेच या पुरवठादारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवारई करण्याबाबत शासन पत्र दि.७ ऑक्टोबर, २०१४ अन्वये संबंधीत मुख कार्यवाही अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देशीत केले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### माधवनगर ( ता.मिरज,जि.सांगली) या पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(१३) १२१०९ (०७-०४-२०१५). श्री. धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माधवनगर( ता.मिरज, जि.सांगली ) या भागात पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेवर अवलंबून असणा-या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि, थकित वीजदेयकामुळे दि.२० फेब्रुवारी, २०१५ ते दि.०२ मार्च, २०१५ पर्यंत सदर योजनेचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. दिनांक ०२ मार्च, २०१५ रोजी वीज देयकाच्या अदायगीनंतर पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यात रोहोयो मजूरांकडे आधार कार्ड नसल्यामुळे त्यांना मजुरीपासून वंचित ठेवल्याबाबत**

**(१४) १२११३ (०८-०४-२०१५). श्री. धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील हजारो रोहयो मजूरांच्याकडे आधार कार्ड नसल्यामुळे त्यांना मजूरी मिळणार नसल्याचे जानेवारी, २०१५ च्या सुरुवातीस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा मजुरांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, शासनाने याबाबतीत काय कार्यवाही केली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :**(१) नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मीठीनदीच्या १७.८४ भागापैकी ११.८४ कि.मी.चा भाग मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतून असून उर्वरित ६ कि.मी. चा भाग मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडे सोपविण्यात आल्याबाबत**

**(१५) १२१३१ (०७-०४-२०१५). श्री. अजित पवार (बारामती), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मीठीनदीच्या १७.८४ भागापैकी ११.८४ कि.मी.चा भाग मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतून असून उर्वरित ६ कि.मी. चा भाग मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडे सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पावर रूपये ९०० कोटी खर्च झाले असून या प्रकल्पांचे काम सन २०१० मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्पाचे काम वेळीच पूर्ण न होण्याची कारणे काय व यावर आणखी किती खर्च अपेक्षित आहे,
(४) असल्यास, या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून किती निधी मिळाला व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३) मिठी नदी विकास कामांचा टप्पा-१ व टप्पा-२ मिळून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील कामांवर रुपये ४८८.४० कोटी व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील कामांवर रु.६२२.२ कोटी इतका खर्च झाला आहे. प्राधिकरणाच्या हद्दीतील कामे २०१० मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते तर महानगरपालिकेच्या हद्दीतील कामे २०१७ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सदर कामास अतिक्रमाणे निष्कासन करण्यासाठी झालेला उशिर, भूसंपादन प्रक्रियेस लागणारा उशिर, न्यायालयीन प्रकरणे इ. मुळे प्रकल्प पूर्णत्वास उशिर झाला आहे. सदर प्रकल्पातील उर्वरीत प्राधिकरणाच्या हद्दीतील कामांवर रु.११ कोटी व महानगरपालिकेच्या हद्दीतील कामांवर रु.६४६.३४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
(४) सदर प्रकल्पासासाठी केंद्र शासनाकडून कुठल्याही प्रकरचा निधी प्राप्त झाला नाही.

---

**दापोली, मंडणगड तालुक्यात (जि.रत्नागिरी) केळशी परिसरात बॉक्साईडचे उत्खनन मोठ्या प्रमाणात होत असल्याबाबत**

**(१६) १२१४३ (०७-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली, मंडणगड तालुक्यात (जि.रत्नागिरी) केळशी परिसरात बॉक्साईडचे उत्खनन मोठ्या प्रमाणात होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उत्खननाबाबत मायनिंग कंपनीकडून ३० कोटी एवढा मोठ्या प्रमाणात रॉयल्टी जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या भागातील उत्खननापासून रॉयल्टी मिळते त्या भागातील रस्त्यावर सदर रॉयल्टीच्या पैशातून रस्ता दुरुस्ती करण्याचा निर्णय घेवूनही रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१३-०५-२०१५) :**(१) मौजा-केळशी, ता.मंडणगड परिसरात बॉक्साईटचे उत्खनन चालु नाही. पंरतु दापोली तालुक्यामध्ये शासनाने मंजुर केलेल्या मौजा-रोवले व मौजा-उंबरशेत येथे मे.अशापुरा माईनकेम लि. दापोली या कंपनीद्वारे मंजुर खनिपट्ट्यामध्ये व मंडगणगड तालुकयातील मौजा-गुडेघर येथे मे.इन्फ्रास्ट्रक्चर लॉजिस्टीक प्रायव्हेट लि. कंपनीद्वारे बाक्साईटचे उत्खनन सुरु आहे.

(२) अंशतः खरे आहे. शासनाने मंजूर केलेल्या खनिपट्टयातील खनिजासाठी संबंधीत कंपन्यांकडून रुपये २४,३६,०९,७३९/- इतकी रक्कम स्वामीत्वधनापोटी शासन जमा केली आहे.
(३) खनिज विकास निधी अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील दापेली तालुकयातील रस्ते विकासाच्या रु.९५.७६ लक्ष रक्कमेच्या ६ कामांना व मंडणगड तालुकयातील रु.६९.३ लक्ष रक्कमेच्या ५ कामांना प्रशसकीय मान्या देण्यात आली असून ज्या भागातील रस्ते बाधित झाले आहेत त्या रस्त्यांची दुरुस्ती खनिज विकास निधी अंतर्गत करण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ नागपुर यांच्याकडे पाठविले आहेत. महामंडळाकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) व (५) मंजूर खनिपट्टयातून खनिजाचे उत्खनन करण्यात अले असून तया खनिजापोटी संबंधीत खाणपट्टा धारकांनी स्वामीत्वधनाची रक्क्म नियमानुसार शासनजमा केलेली असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.बाळासाहेब कोकण विद्यापीठ दापोली येथील रोजंदारीवरील कामगारांना नियमित सेवेत घेण्याची केलेली मागणी**

**(१७) १२१४६ (०८-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.बाळासाहेब कोकण विद्यापीठ दापोली येथील रोजंदाररीवरील कामगारांना नियमित सेवेत घेण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व मा.कृषि मंत्री यांचेकडे तेथील लोकप्रतिनिधी व नागरिक यांच्याकडून सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) रोजंदार कामगारांना नियमित सेवेत घेण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाने दि.१९.०३.२०१५ रोजीच्या बैठकीत मंजुरी दिली आहे.

---

**महाराष्ट्रातील सर्व शहीद स्मारकांना तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत**

**(१८) १२१६८ (०८-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी तत्कालीन ग्रामविकास मंत्री यांनी महाराष्ट्रातील सर्व शहीद स्मारकांना तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपुर विधानसभा यांच्या दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ च्या पत्रास उत्तर देताना शहीद स्मारकांना तिर्थ क्षेत्रांचे निकष लागू होत नसल्याने मागणी अमान्य केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिर्थ क्षेत्रांचे निकष हे शहीद स्मारकांच्या निकषापेक्षा कमी दर्जाचे आहेत काय,
(३) नसल्यास, शहीद स्मारकांना तीर्थ क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) होय.
(२) तिर्थक्षेत्राबाबत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात आले असून, शहिदांची स्मारके या निकषात बसत नाहीत.
(३) सामान्य प्रशासन विभागामार्फत स्मारके उभारणे याबाबतचे सर्वकष धोरण ठरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तरी सदर विषयी धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्यावर शहीद स्मारकांच्या विकासाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील 21 गावांचे पुनर्वसन**
**निधी अभावी प्रलंबति असल्याबाबत**

**(१९) १२१७३ (०८-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर), श्री. बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्प राज्यात अव्वल असल्याचे शिक्कामोर्तब राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण समितीने केले आहे असे असले तरी २१ गावांचे पुनर्वसन निधी अभावी अद्यापही रखडले आहे, या गावांच्या पुनर्वसनासाठी ३७५ कोटींची आवश्यकता असून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे, व्याघ्र प्रकल्पातून गावांच्या पुनर्वसनाशिवाय वाघांचे संगोपन शक्य नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सर्व गावांचे पुनर्वसन केले आहे काय,
(३) नसल्यास, शासनाने त्याबाबत कोणती कारवाई केली आहे ?
**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१५) :**(१), (२) व (३) मेळघाट व्याघ्र प्रकल्पास वर्ष २०१२-१४ करीता NTCA Award for Excellence in Village relocation & settlement हा पुरस्कार दिल्ली येथे दिनांक २०/०२/२०१५ रोजी मा.राज्य मंत्री (स्वतंत्र कार्यभार) पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांचे हस्ते देण्यात आला आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात असलेल्या एकुण ३३ गावांपैकी सन २००१-०२ ते २०१३-१४ या कालावधीत १२ गावांचे पुनर्वसन यशस्वीरित्या करण्यात आले आहे.

केलपाणी हया गावांच पुनर्वसन सन २०१४-१५ मध्ये सुरु करण्यात आले, केलपणी येथील आतापर्यंत ३९७ पैकी २७२ कुटूंब पुनर्वसीत झाली असून उर्वरीत कुटूंबाचे पुनर्वसन करण्यासाठी शिल्लक आहेत. त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये तलई व चुनखडी हया २ गावांतील एकुण ४०४ कुटूंबांचे पुनर्वसन प्रस्तावि आहे. पुनर्वसन प्रक्रिया ही कुटूंबांची पुनर्वसनास संमती व अनुदान उपलब्धतेवर अवलंबवून आहे. पुनर्वसन लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने राज्य योजनेतून जास्तीत जास्त अनुदान उपलबध करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे तसेच केंद्र शासनाकडेडी पाठपुरावा करण्योत येत आहे.

दिनांक २७/१२/२००७ च्या अधिसूचनेन्वये मेळघाट व्याघ्र प्रकल्पाध्ये १५००.४९ चौ.कि.मी. क्षेत्र धोकाग्रस्त व्याघ्र अधिवास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. वन्यजीव संवर्धन अधिनियम १९७२ चे कलम ३८ (V) नुसार धोकाग्रस्त व्याध्र अधिवास क्षेत्र मानवरहीत करावयाचे आहे. पुनर्वसन करण्यात आलेलेल्या गावांतील क्षेत्र ताब्यात घेऊन सदर क्षेत्रात करण्यात आलेल्या व्याघ्र अधिवास विकास कामांमुळे सदर क्षेत्रात निश्चितच वाघांचा संचार वाढल्याचे निदर्शनास आलेले आहे.

---

**राज्यातील जिल्हा औरंगाबाद येथील फुले नगर, उस्मानपूर चौकात भर रस्यावर देशी दारु दुकानास परवानगी दिल्याबाबत**

**(२०) १२१८२ (०७-०४-२०१५). श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा औरंगाबाद येथील फुले नगर, उस्मानपूर चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकरस्मारक समितीच्या शिक्षण उपक्रमापासून १०० मीटरच्या आत भर रस्यावर देशी दारु दुकानास परवानगी दिल्याने परिसरातील विद्यार्थी महिला यांना समाजकंटकांपासून मोठया प्रमाणावर त्रास होत असल्याने सदरील देशी दारु दुकान बंद करण्याची मागणी विभागातील विविध सामाजिक, धार्मिक, महिला, शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी, जागरुक नागरीक, लोक प्रतिनिधींनी माहे जाने. २०१५ वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री , मा. राज्यमंत्री (गृह), मा. मंत्री (उत्पादन शुल्क), मा. पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्त (औरंगाबाद जिल्हा/ शहर) यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदरील प्रकरणी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून सदरहू पिरबाजार, महात्मा फुले नगर, उस्मानाबाद, औरंगाबाद येथील देशी दारुची सीएल-३ अनुज्ञप्ती ही महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ च्या नियम २४ (४) (ब) नुसार अंतरनिर्बंधमुक्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच सदरहू सीएल-३ अनुज्ञप्ती ही बंद करण्यात येऊ नये असे मा.जिल्हा सत्र न्यायालय, औंरगाबाद यांनी दि. २९.१.१९९४ रोजी आदेश पारीत केले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातील (जि.औरंगाबाद)**
**बिंदू नामावलीची अद्यावत माहिती सादर करण्याचे निर्देश**
**अनुसूचित जाती जमाती आयोगाने दिल्याबाबत**

**(२१) १२१८३ (१०-०४-२०१५). श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातील (जि.औरंगाबाद) बिंदू नामावलीची अद्यावत माहिती सादर करण्याचे निर्देश अनुसूचित जाती जमाती आयोगाने माहे फेब्रुवारी, २०१५ वा त्यासुमारास नामावली अभिलेख आढावा बैठकीत दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात रोस्टर लागू न केल्यामुळे संबंधित अधिका-यांवर आरक्षण कायदा २००४ प्रमाणे कारवाई अद्याप झाली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोस्टर लागू न केल्यामुळे संस्थेतील कर्मचा-यांचे पूर्व लक्षीप्रमाणे पदोन्नती व आर्थिक भरपाई शासनातर्फे करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रास (जिल्हा औरंगाबाद) बिंदुनामावलीची अद्ययावत माहिती सादर करण्याचे निर्देश अनुसूचित जाती जमाती आयोगाने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये दिलेले नसून दिनांक २४.२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत दिलेले आहेत.

(२), (३) व (४) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रास, दि.११.०७.२०१३ पासून रोस्टर लागू करण्यात आले आहे. पदोन्नती व सरळ सेवा भरतीचे धोरण मंजूर न झाल्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांना लाभ देण्यात आलेला नाही. ७२ व्या कार्यकारी समितीच्या ठरावाप्रमाणे पदोन्नती / सरळ सेवा भरतीचे धोरण कार्यकारी समिती व सुकाणू समितीमध्ये मंजूर झाल्यानंतरच अधिकारी / कर्मचारी यांना लाभ देण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सरळसेवा व पदोन्नती धोरण हे मा.सुकाणू समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात (जि.औरंगाबाद)**
**काही कर्मचारी मागिल दाराने विना जाहिरात, विना**
**लेखी परिक्षा व विना मुलाखत नियुक्ती केलेबाबत**

**(२२) १२१८४ (१०-०४-२०१५). श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात (जि.औरंगाबाद) काही कर्मचारी मागिल दाराने विना जाहिरात, विना लेखी परिक्षा व विना मुलाखत नियुक्ती करण्याची बाब माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नियमबाह्य कर्मचारी भर्ती प्रकरणी सुप्रीम कोर्टाच्या उमादेवी विरुद्ध राज्य खटल्याप्रमाणे कारवाई होऊन नियमबाह्य भर्ती केलेल्या कर्मचा-यांना प्रशासनातर्फे नोकरीतून काढून टाकण्याची कार्यवाही केली जाईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात, विना जाहिरात, विना लेखा परिक्षा व विना मुलाखत, कर्मचारी नियुक्ती करण्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नव्हती. तथापि, मा.सुकाणू समितीच्या दि.१३.०६.२०१३ रोजीच्या बैठकीत १३ कर्मचा-यांसंबंधीचा मुद्या उपस्थित करण्यात आला होता.
(२), (३) व (४) प्रकरणात सदर कार्यालयाने १३ ही कर्मचा-यांच्या नियुक्ती संबंधीच्या कागदपत्रांची तपासणी केलेली आहे. त्यात असे आढळून आलेले आहे की, १२ स्थायी अधिकारी व कर्मचारी, नियमानुसार नियुक्त करण्यात आलेले आहेत. फक्त एका कर्मचा-यांची नियुक्तीसंबंधीची कागदपत्रे कार्यालयात आढळून आलेली नसून सदर कागदपत्र गहाळ झाल्याची पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिलेली आहे. तथापि, सदरहू कर्मचा-याची निवड रितसर झालेली असून त्यांचे नियुक्ती आदेश कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर बाब ही ५९ व्या सुकाणू समितीमध्ये ठेवण्यात आली होती. तथापि, प्रकरणी निर्णय न होऊ शकल्यामुळे सुकाणू समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येणार असून सुकाणू समितीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## कुर्ला, मुंबई येथील आरे डेअरीत क्रीम सेप्रटर मशीन नादुरूस्त असल्याबाबत

**(२३) १२२१२ (३०-०४-२०१५). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला, मुंबई येथील आरे डेअरीत क्रीम सेप्रटर मशीन नादुरूस्त असल्यामुळे ५०० कामगारांना गेले वर्षभर काम नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शीतल आर्च या खाजगी कंपनीला “आरे”च्या उत्पादनांचे कंत्राट दिल्याने त्यांचे हित जपण्याकरीता तत्कालीन आयुक्त केरूरे हे दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आरे डेअरीचे उत्पादन सुरळीत चालू राहून कामगारांना काम मिळण्याकरीता शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०५-२०१५) :**(१) कुर्ला दुग्धशाळेतील क्रिम सेपरेटर यंत्र नादुरुस्त आहे हे खरे आहे. तथापि, तेथील ५०० कामगारांना गेले वर्षभर काम नसल्याची बाब खरी नाही.
(२) हे खरे नाही.

(३) मातृदुग्धशाळा विभागातील प्रक्रिया व पॅकींग शाखेचे काम बंद असून कुर्ला दुग्धशाळेच्या कार्यक्षेत्रातील वितरीत होणारे दूध वरळी दुग्धशाळेत पिशवीबंद करुन वितरीत करण्यात येत आहे. त्यासाठी कुर्ला दुग्धशाळेतील संबंधित कर्मचारी दररोज दोन पाळीसाठी वरळी दुग्धशाळेत आळी-पाळीने पाठविण्यात येतात. सद्यस्थितीत सुमारे १६००० लिटर इतके दुधाचे वितरण सुरु आहे. तसेच आरे वरळी दुग्धशाळेकडून दररोज उत्पादित होणारे क्रिम हे कुर्ला दुग्धशाळेत येत असून त्यापासून तूपाचे उत्पादन करण्यात येवून ते पिशवीबंद करुन वितरणाचे काम या दुग्धशाळेमार्फत सुरु आहे. उर्वरीत कर्मचारी प्रशासन, लेखा, दुग्धशाळा, दूध वितरण, सुरक्षा, प्रशितल, यांत्रिक, बाष्पक, विद्युत, भांडार, परिवहन व तूप विभाग इ. विभागातून दैनंदिन कामासाठी कार्यरत आहेत.

---

**राज्यातील सेवा योजना कर्यालयातील गेल्या तीन वर्षात**
**मराठी बेरोजगारांची संख्या वाढल्याबाबत**

**(२४) १२२३६ (०७-०४-२०१५). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ. आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेवा योजना कर्यालयातील गेल्या तीन वर्षात मराठी बेरोजगारांची संख्या २४ लाखांवरुन ३० लाखांवर पोहचल्याने दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मराठी बेरोजगारांना कामे मिळत नसल्याने ८० टक्के नोक-या मराठी तरुणांना देण्यासाठी शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) हे अशंतः खरे आहे. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात फक्त मराठी उमेदवारांची नोंदणी वेगळ्याने ठेवण्याची यंत्रणा नाही. तथापि, जानेवारी, २०१५ अखेर राज्यातील बेरोजगारांची संख्या ३५,६४,०३५ एवढी आहे.

(२) राज्यातील भूमिपूत्र बेरोजगारांना नोक-या मिळाव्यात यासाठी अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ नोव्हेंबर, २००७ रोजी अभ्यास गट निर्माण करण्यात आला. तदनंतर या अभ्यास गटाची पुर्नरचना करुन सदर गटाचे अध्यक्ष पद प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार यांना दिनांक २९ जुलै, २००८ पासून देण्यात आले.

(३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये सर्व सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक

उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच राज्यातील सर्वच बेरोजगार उमेदवारासाठी शासनामार्फत खालील योजना राबविण्यात येतात.

(अ) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे संगणकीकरण.

(ब) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका.

(क) रोजगार मेळावे.

(ड) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे.

(इ) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे.

(ई) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम.

(उ) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार भागातील विजेच्या विविध समस्या व त्यावर करावयाची आवश्यक ती उपाययोजना**

**(२५) १२२४५ (०४-०४-२०१५). श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार भागातील विजेच्या विविध समस्या व त्यावर करावयाची आवश्यक ती उपाय योजना करण्यासंबंधीचे सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीव्दारे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री (अजितदार पवार) यांचेकडे देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाव्दारे वसई-विरार मधील विजपुरवठा सुधारण्यांसाठी विविध इलेक्ट्रीकल प्रस्तावित आठ कामांसाठी सुमारे ७० कोटी रुपायाचा निधी मिळण्याची मागणीही सदरहू निवेदनाव्दारे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामांची निकड लक्षात घेऊन उपरोक्त कामाच्या पुर्ततेसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरची कामे आय.पी.डी.एस. व दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती या योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

(४) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती व आयपीडीएस या योजना केंद्रशासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्य आहेत. सदर योजनांना केंद्र शासनाकडून परवानगी मिळण्याची प्रक्रिया चालू आहे.

---

**मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) ग्राम सेवकांच्या पगाराबाबत.**

**(२६) १२२५४ (०८-०४-२०१५). श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) ग्राम सेवकांना गेल्या चार महिन्यांचा पगार अद्यापही देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही ४ महिन्यांचा पगार न झाल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांनी आर्थिक कुचंबणा होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची वस्तुस्थिती काय आहे व संबंधित ग्रामसेवकांचे पगार नियमित वेळेवर होण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :**(१), (२) व (३) पंचात समिती मोखाडा येथील ग्रामसेवकांचे माहे ऑक्टोबर, २०१४ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीतील वेतन सेवार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे व तरतुदी अभवी प्रलंबित होते. माहे जानेवारी, २०१५ च्या वेतन देयकासोबत मागील चार महिन्यांचे थकित वेतन माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये पूर्णपणे अदा करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कुठल्याही महिन्याचे वेतन प्रलंबित नाही.

---

**राज्यातील उद्योगाला पुरविण्यात येणा-या वीजेच्या दरात**
**मोठ्या प्रमाणात केलेल्या वाढीबाबत**

**(२७) १२२७४ (०४-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगाला पुरविण्यात येणा-या वीजेच्या दरात मोठ्या प्रमाणात केलेल्या वाढीसंदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योजक त्यांचे उद्योग धंदे बंद करुन आंदोलन करण्याच्या पवित्र्यात असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारस उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग बांद करुन कर्नाटकांत जाण्याचा मार्ग स्वीकारला असल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योजकांबरोबर चर्चा करण्याची तयारी शासनाने दाखवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशी चर्चा केली आहे काय आसल्यास, वीज दरवाढी संदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) होय. कोल्हापूरच्या दिनांक १०.०१.२०१५ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक १२.१.२०१५ ते दिनांक १४.१.२०१५ रोजी उद्योग बंद ठेवण्याबाबतचा इशारा उद्योजकांना दिलेला होता. परंतु सदर कालावधीत होणारा 'उद्योग बंद' मागे घेण्यात आला होता.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुळशी धरणातील (जि.कोल्हापूर) काठावरील व विस्तारातील गावांना निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(२८) १२२७७ (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळशी (जि.कोल्हापूर) धरणातून गत दोन वर्षापासून पाणी मोठया प्रमाणात सोडल्याने तुळशी काठावरील व विस्तारातील गावांना तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याने सदर धरणातील पाण्याचे नियोजन करण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर पाण्याचे नियोजन करण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०६-२०१५) :** (१) नाही.

सन २०१२-२०१३ मध्ये धरण ९८.६३ टक्के भरले होते व सन २०१३-२०१४ मध्ये पूर्ण क्षमतेने भरले होते. गेल्या दोन्ही वर्षात प्रकल्पाच्या प्राथमिक सिंचन कार्यक्रमाप्रमाणे पाणी पुरवठा करणेत आला आहे. सिंचन व बिगर सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा केला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पाणीपुरवठा योजनांद्वारे गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(२९) १२२९० (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात गत १० वर्षात १ हजार कोटी रुपयांहून अधिक पाणी पुरवठा योजनांवर खर्च झाला तरी अनेक योजना कागदोपत्री पूर्ण झाल्याने किमान दिडशे व दोनशे गावांना पाणी देण्याची मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने यांस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच ज्या गावांनी मागणी केली आहे त्या गावांना पाणी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) वस्ती लोकसंख्या वाढीमुळे ज्या गावांनी नवीन या वाढीव योजनेची मागणी केली आहे. त्यांचा सन २०१५-१६ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल आराखडयात समावेश करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तांबाळे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील इंदिरा गांधी महिला सहकारी साखर कारखान्यावर प्रशासक नेमणेबाबत**

**(३०) १२२९९ (०९-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) तांबाळे येथील इंदिरा गांधी महिला सहकारी साखर कारखान्यावर प्रशासक नेमावा, कारखाना चालवण्यास देण्यासाठी करारपत्र पाच वर्षाचेच असावे, या मागणीचे निवेदन साखर सहसंचालक यांना दि.१.१.२०१५ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीच्या संदर्भात निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे. प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांना हे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) नाही.
(३) इंदिरा गांधी भारतीय महिला सहकारी साखर कारखाना लि. तांबाळे या कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत दि. २.११.२०१५ पर्यंत आहे. त्यामुळे प्रशासक नेमण्याबाबत कार्यवाही करता येणार नाही. तसेच कारखाना दिर्घ मुदतीने सहभागी/भागीदारी तत्वावर चालविण्यास देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

---

**रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहरातील साळवीस्टॉप येथील रेशन दुकानामधील तसेच रत्नागिरी तालुक्यात वितरित होणा-या धान्यामध्ये भेसळ होत असल्याबाबत**

**(३१) १२३०४ (०७-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहरातील साळवीस्टॉप येथील रेशन दुकानामध्ये दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या गव्हामध्ये दगडगोटे आणि

माती जास्त प्रमाणात असल्याचे व रत्नागिरी तालुक्यात वितरीत होणा-या धान्यामध्ये भेसळ होत असल्याचेही माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार तालुक्यात भेसळयुक्त धान्याचा, गव्हाचा पुरवठा करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :**(१) साळवी स्टॉप येथे नसून नाचणे येथील स्वस्त धान्य दुकानांत शासकीय गोदाम, रत्नागिरी येथून माहे जानेवारी महिन्यात घेतलेल्या एका गव्हाच्या पोत्यात दगडगोटे, माती मिश्रीत गहू आढळून आले होते.

(२) व (३) याबाबत पुरवठा निरीक्षक अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदर गव्हाची विक्री तात्काळ बंद करण्याच्या सूचना देऊन हे खराब झालेले गव्हाचे पोते शासकीय गोदामातून बदलून आणण्यात आले आहे.

रास्तभाव दुकानदारांना धान्य खराब झाले असल्यास त्याची विक्री करण्यात येऊ नये, गोदाम व्यवस्थापक/गोदामपालक यांना धान्य दुकानदारांना धान्य वितरीत करतांना चांगल्या प्रतीचे असल्याबाबत खात्री करुन वितरीत करण्यात यावे अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. भारतीय अन्न महामंडळ रत्नागिरी व महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ रत्नागिरी यांना गोदामात पाठविण्यात येणारे अन्नधान्य चांगले व स्वच्छ असल्याबाबतची खात्री करुन पाठविण्याचे कळविण्यात आले आहे.

---

## जळगावं जिल्ह्यातील केळी करपा निर्मुलनासाठी पाच वर्षीय महत्वाकांक्षी योजना राबविणेसाठी रु. ९० कोटींची तरतूद केल्याबाबत

**(३२) १२३०६ (०८-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगावं जिल्ह्यातील केळी करपा निर्मुलनासाठी पाच वर्षीय महत्वाकांक्षी योजना राबविणेसाठी रु. ९० कोटींची तरतूद केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षाची मुदत संपुनही आतापर्यंत केवळ १७-१८ कोटी रुपये खर्च झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केळी करपा निर्मुलनासाठी एवढा मोठा निधी उपलब्ध होऊनही केळी करपा रोगाचे निर्मुलन पुर्णपणे झाले नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केळी करपा निर्मुलनासाठी योजनेसे जळगावं जिल्ह्यात राबविणेसाठी मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) नाही
(२) सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या तीन वर्षात सदर योजना राबविण्यात आली असून रु. १७.६२ कोटी खर्च झाला आहे.
(३) अंशत: खरे आहे
(४) व (५) केळी करपा निर्मुलनासाठी योजना जळगाव जिल्हयात राबविणेसाठी मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन नाही

---

**कोळसा टंचाईमुळे वीज निर्मितीस अडथळे निर्माण होत असल्याबाबत**

**(३३) १२३२२ (०८-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिपनगरसह राज्यातील सर्वच औष्णीक वीज केंद्रात दोन महिन्यापासून कोळसा टंचाईमुळे वीज निर्मितीस अडथळे निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिपनगर संच क्र.२ हा मुबलक कोळसा अभावी गेल्या महिन्याभरापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दररोज किमान १५० मेगावॅट वीज निर्मिती रखडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे महाजनकोला कोट्यवधी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, दिपनगर संच क्र.२ पूर्ववत सुरु करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५) :**(१) होय,
(२) होय,
(३) दिपनगर संच क्र.२ ची स्थापित क्षमता २१० मेगावॅट असुन तांत्रिकदृष्ट्या सदर संच बंद असल्यामुळे त्या प्रमाणात वीज निर्मिती होत नाही. तथापि, सदर बंद संचाचा कोळसा इतर कार्यक्षम संचाकडे वळवून त्याप्रमाणात वीज निर्मितीतील तूट भरुन काढण्यात आलेली आहे.
(४) नाही,
(५) पुरेशा प्रमाणात व योग्य दर्जाचा कोळसा मिळावा यासाठी संबंधित कोळसा कंपन्या तसेच केंद्रीय कोळसा व ऊर्जा मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

---

## महिला व बालकल्याण विभागाने शंभर बालकांच्या एका बालगृहासाठी अधिक्षकांसह अकरा पदांचा आकृतीबंध लागू केल्याबाबत

**(३४) १२३२५ (०९-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागाने दिनांक २९ जुलै, २००६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार शंभर बालकांच्या एका बालगृहासाठी अधिक्षकांसह अकरा पदांचा आकृतीबंध लागु केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अकरा पदांना थेट वेतनाची तरतूद न करता ते बालकांच्या परिपोषण अनुदानातुन (रु.२१) भागवावा लागतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपु-या अनुदानातून बालकांचाच खर्च भागविता येत नसल्यामुळे कर्मचा-यांच्या वेतनाचे अनुदान देण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या बालगृहातील कर्मचा-यांना शासनामार्फत मानधन/वेतन दिले जात नाही. शासनामार्फत स्वयंसेवी संस्थांना दिलेल्या सहाय्यक अनुदानातून कर्मचा-यांचा खर्च भागविला जातो.

---

## टोरेंटो पॉवर या कंपनी सर्वसामान्य नागरीकांना लुटत असल्याबाबत

**(३५) १२३३६ (३०-०४-२०१५). श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात व परिसरात टोरेंटो पॉवर या कंपनीदवारे विद्युत पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी सर्वसामान्य नागरीकांना जास्त बिले देत असल्याचे अनेक तक्रारी नागरीकांकडून आल्याने तेथील लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी मा.ऊर्जा मंत्री यांना तक्रार/निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५) :**(१) होय.

(२) होय, दिनांक २३ डिसेंबर, २०१४ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) सदर बाबत शासन स्तरावर योग्य ती दखल घेण्यात आली असून ग्राहकांना द्यावयाच्या सेवेमध्ये सुधारणा करण्याबाबत मे. टोरेंट पॉवर कंपनीला निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील खोणी या गावात वालचंद इंडस्ट्री कंपनीमध्ये डाईंग विभागात अपघात झाल्याबाबत**

**(३६) १२३४० (०६-०४-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील खोणी या गावात वालचंद इंडस्ट्री कंपनीमध्ये डाईंग विभागात कायम अपघात घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीमध्ये नुकताच एका कामगारांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०६-२०१५) :**(१) मे.वालचंद यार्न इंडस्ट्रीज लि.१७०४/१, साईनाथ इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, मिठपाडा, गाव-खोणी, भिवंडी, जि.ठाणे या कारखान्यामध्ये सन २०१० ते सन २०१४ या ५ वर्षाच्या कालावधीत अपघात झालेला नाही. तथापि, सन २०१५ मध्ये दिनांक ०३.०१.२०१५ रोजी प्राणघातक अपघात झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर कारखान्यामध्ये दिनांक ०३.०१.२०१५ रोजी झालेल्या अपघातामुळे जखमी झालेल्या दोन कामगारांचे उपचारादरम्यान निधन झाले आहे, हे खरे आहे.

(३) व (४) कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७ च्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे येथे फौजदारी खटला (खटला क्र.७७५/२०१५) दिनांक ०७.०३.२०१५ रोजी दाखल केलेला आहे.

---

**भिंवडी तालुक्यातील (जि.ठाणे) मडक्याचा पाडा (कासपाडा) येथील अंगणवाडी इमारत पुर्णतः नादुरुस्त असल्याबाबत**

**(३७) १२३५६ (०६-०४-२०१५). श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी तालुक्यातील (जि.ठाणे) मडक्याचा पाडा (कासपाडा) येथील अंगणवाडी इमारत पुर्णतः नादुरुस्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक लेखी तक्रारी/निवेदन देऊनही हे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मडक्याचा पाडा अंगणवाडी केंद्र सन १९९४-९५ मध्ये JRY मधुन बांधण्यात आले होते. सदर इमारत पाडून नवीन इमारत बांधण्याकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक मंडळ, ठाणे यांचेकडून मंजुरी प्राप्त झाली असून नवीन इमारत बांधकामासाठी निधी प्राप्त झाल्यानंतर सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) ग्रामीण भागात जिल्हापरिषदेच्या शाळेसमोरील रोहित्र (डीपी) मधूनहोत असलेला स्फोट**

**(३८) १२३७८ (०४-०४-२०१५). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) ग्रामीण भागात जिल्हापरिषदेच्या शाळेसमोर काही वर्षापासून रोहित्र (डीपी) लावण्यात आले असून त्यामध्ये वारंवार स्फोट होत असल्याने तेथील विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याने सदरचे रोहित्र अन्यत्र ठिकाणी हलविण्यासंदर्भात जिल्हापरिषद शाळेने संबंधित अधिका-यांकडे वारंवार निवेदने व तक्रार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सदरची रोहित्र अन्यत्र हलविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) होय.

(२) सदर रोहित्र फेब्रुवारी,२०१५ मध्ये सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डाटा एंन्ट्री ऑपरेटरनांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन देण्यासंदर्भात.**

**(३९) १२३७९ (०८-०४-२०१५). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये डाटा एंट्री ऑपरेटर म्हणून नेमणूक केलेल्या कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन न देणे तसेच गेल्या ९ महिन्यापासून वेतनही दिले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या डाटा एंन्ट्री ऑपरेटरनांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन देण्यासंदर्भात तसेच थकीत वेतन तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धर्मादाय रूग्णालयामध्ये गरिबांसाठी मोफत व सवलतीच्या**
**दराने १० टक्के खाटा राखून ठेवल्या जात नसल्याबाबत**

**(४०) १२३८१ (०७-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ), डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री. चंद्रदीप नरके (करवीर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय रूग्णालयामध्ये गरिबांसाठी मोफत व सवलतीच्या दराने १० टक्के खाटा राखून ठेवल्या जातात किंवा नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागाने जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्याचा आदेश सन २०१० मध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समित्यांमध्ये जिल्हाधिकारी, दोन विधानसभा, विधानपरिषद सदस्य, जिल्हा शल्यचिकित्सक धर्मादाय आयुक्त व निवासी उप जिल्हाधिकारी यांचा समावेश करण्यात यावा असे आदेश दिले होते परंतु सदर समित्या गठीत झाल्या नसल्याचे नुकतचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समित्या गठीत न होण्याची कारणे काय आहेत व यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :**(१) होय,

(२) अंशत: खरे आहे, राज्यातील पालघर, वाशिम, अकोला, बुलढाणा वगळता इतर जिल्हयात समित्या गठीत झाल्या आहेत.

(३) व (४) कोकण विभागात पालघर जिल्हा नव्याने अस्तित्वात आल्याने जिल्हास्तरावर समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, अमरावती विभागात वाशिम, अकोला व बुलढाणा या जिल्हयात जिल्हास्तरावर समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**माडबन (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे उभारण्यात येणा-या अणुऊर्जा प्रकल्पाबाबत**

**(४१) १२३८६ (०४-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यातील माडबन येथे उभारण्यात येणा-या अणुऊर्जा प्रकल्पाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, सदर अणुऊर्जा प्रकल्पास रत्नागिरी व आजूबाजूच्या जिल्ह्यातील गांवाचा विरोध आहे याची दखल शासनाने घेतली आहे काय व त्यानुषंगाने आतापर्यंत निर्णयात्मक काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप निर्णयात्मक कार्यवाही करण्यात विलंब होत असल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५) :** (१) सदरचा अणुऊर्जा प्रकल्प केंद्र शासनाच्या अणुऊर्जा विभागाअखत्यारीतील न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.या उपक्रमांकडून उभारला जात आहे. प्रस्तुतचा प्रकल्प उभारण्याकामी पूरक/साहाय्यकारी भुमिका राज्य शासनाची आहे.
(२) सदर प्रकल्पास काही लोकांकडून विरोध दर्शविला जात आहे. मात्र, या प्रकल्पांकरिता ९३८.०२ हे. जमिन संपादीत केली असून या जमिनीच्या बहुतांश खातेदारांनी त्याबाबतचा मोबदला/सानुग्रह अनुदानदेखील स्वीकारले आहे.

तसेच प्रकल्पाच्या भुसंपादनाचे काम पूर्ण झाले आहे. बाधित प्रकल्पग्रस्तांना देय सुविधांबाबत शासनाने न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या प्रकल्प संस्थेशी करारनामा केला आहे. सदर करारनाम्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची योजना न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येणार आहे. तसेच पुनर्वसनावर होणारा खर्च न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया करणार आहे.

या प्रकल्पाच्या बाह्य संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पाच्या ठिकाणी तुरळक प्रमाणात कामे सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषद मधील वर्ग-१, वर्ग-२ च्या पशुधन विकास अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) १२३९३ (३०-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदामधील वर्ग-१, वर्ग-२ च्या पशुधन विकास अधिका-यांची २१ पदे गेली काही वर्षापासून रिक्त असून सदर रिक्त पदांमुळे पशुधन विकास अधिकारी उपलब्ध न झाल्याने जनावरे मृत्युमुखी पडण्याचा प्रमाणात वाढ झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे तात्काळ भरण्याबाबत दि. १६ डिसेंबर, २०१४ रोजी लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांना पत्रव्यवहार करूनही अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे,
(४) तदनुसार, उपरोक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिका-यांना देण्यात येऊन पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत व जनावरे मृत्युमुखी पडल्याची कोणतीही घटना घडलेली नाही. व याबाबत पशुपालकांकडून कुठल्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर कारण्यात आले होते. त्यानुसार आयोगाने दि.१२.३.२०१५ रोजी ३०० पात्र उमेदवारांची यादी जाहीर केलेली आहे. सदर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अधिका-यांना पदस्थापना देताना रत्नागिरी जिल्ह्यातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड तालुक्याच्या (जि. पूणे) ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वीज वितरण कंपनीचे ट्रान्सफार्मर चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याबाबत

**(४३) १२३९६ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्याच्या (जि. पूणे) ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वीज वितरण कंपनीचे ट्रान्सफार्मर चोरीला जाण्याचे प्रकार वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलीसांनी तपास केला आहे काय, तपासात काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच ही चोरी रोखण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) होय,
(2) पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात माहे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ अखेर खेड तालुक्यातील चाकण व आळंदी पोलीस स्टेशनला प्रत्येकी ४ गुन्हे दाखल झाले आहेत. वीज वितरण कंपनीचे ट्रान्सफार्मर चोरीला जाण्याचे प्रकार झाले असून त्याबाबत चाकण पोलीस स्टेशनला

गु.र.क्र.१/२०१५, ४/२०१५, ५/२०१५, ६/२०१५ भारतीय विद्युत कायदा कलम १३६, भा.दं.वि, कलम ४२७ तसेच आळंदी पोलीस स्टेशनला गु.र.क्र.१/२०१, २/२०१५, ३/२०१५, ६/२०१५ भारतीय विद्युत कायदा कलम १३६, भा.दं.वि.कलम ४२७ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) ट्रान्सफार्मर चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध होण्यासाठी वीज वितरण कर्मचारी यांची स्वतंत्र गस्त नेमण्यात येत आहे. तसेच गावातील मोहल्ला कमिटी व ग्राम सुरक्षा दल सदस्यांच्या बैठका घेवून योग्य ती दक्षत घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न, उद्भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुळगाव असलेल्या आंबडवे (मंडणगड, जि.रत्नागिरी) या गावास "ड" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(४४) १२४०६ (०७-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळगाव असलेल्या आंबडवे (मंडणगड, जि.रत्नागिरी) या गावास राज्य शासनाने दोन वर्षापूर्वी "ड" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन स्थळाचा दर्जा मिळूनही अद्याप पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :**(१) नाही.

तथापि या स्थळाला ''क'' वर्गीय पर्यटन स्थळाचा दर्जा दिलेला आहे.

(२) नाही.

सन २००८-०९ मध्ये जिल्हा वार्षिक ''क'' वर्ग पर्यटन स्थळाच विकास योजनेतंर्गत आंबडवे येथे पर्यटक निवास बांधकाम या कामासाठी रु.२४.९९ लाख इतकी रक्कम वितरीत केली असून काम पूर्ण झाले आहे. सन २०१२-१३ मध्ये आंबडवे गावाकडे जाणा-या पणदेरी म्हाप्रळ रस्त्यावर गॅन्ट्री फलक बसविणे या कामासाठी रु.१३.११ लाख वितरीत केले असून काम पूर्ण आहे.

तसेच रत्नागिरी जिल्ह्याचा पर्यटन विकासाचा बृहद् आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये आंबडवे या पर्यटन स्थळाचा समावेश आहे. सदर प्रस्तावाची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत छाननी सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयाती अर्जुना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(४५) १२४११ (०८-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील अर्जुना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असून या कामांची चौकशी करण्याची मागणी तळवडे (ता.राजापूर) येथील प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी नुकतीच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीमध्ये अर्जुना प्रकल्पाच्या कालव्याच्या मो-या व फुटब्रीज बांधण्याची कामे सुरु असून ही सर्व कामे दिलेल्या मापदंडानुसार होत आहेत की नाही याकडे संबंधित विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(४) तद् नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) नाही.

अर्जूना प्रकल्पाच्या मो-या व फ्रुटब्रीजची बांधकामे सुरु असून ही सर्व कामे विहीत विर्निदिष्ठासह होत आहेत. तसेच कामाच्या गुणनियंत्रणासाठी आवश्यक चाचण्या घेतल्या जात आहेत. कार्यकारी अभियंता गुणनियंत्रण विभाग, अलोरे यांचेमार्फत कामाच्या गुणवत्तेचे परिक्षण (Audit) करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कसबा ते फणसवणे या रस्त्याची झालेली दुरावस्था

**(४६) १२४२१ (०९-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कसबा ते फणसवणे या रस्त्याची दुरावस्था झालेली असून सदर मार्गाच्या साईडपट्टया धोकादायक झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर मार्गाची सुधारणा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित कसबा ते फळसवणे कि.मी. १/०० ते ४/०० या लांबीमधील काही भागात रस्त्याची खचलेली साईटपट्टी विभागाकडील उपलब्ध मंजुरांमार्फत मुरुमाने भरण्यात आली असून सद्यस्थितीत सदर लांबीताल रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत पणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गणेशखिंड- दोणवली मार्गे गांग्रई या मार्गाची दुरावस्था झाल्याबाबत

**(४७) १२४२५ (०९-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गणेशखिंड- दोणवली मार्गे गांग्रई या मार्गाची अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर मार्गाची सुधारणा व रुंदीकरणाचे काम होणेबाबत स्थानिकांकडून वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाचे काम न झाल्यास आंदोलनाचा इशाराही स्थानिकांकडून देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गाची सुधारणा व रुंदीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :**(१) व (२) होय.

(३) गणेशखिंड मालदोली व गांग्रई या मार्गावरील खालील कामे अर्थसंकल्प मार्च २०१५ मध्ये प्रस्तावित करुन मंजूर झाली आहेत.

अ) भोम दोणवली गांग्रई रस्त्यावरील प्रजिमा -२९ कि.मी. १२/०० ते १६/०० मधील रस्त्याचे रुंदीकरणासह डांबरीकरण करणे. ता. चिपळूण, जि.रत्नागिरी रु.२००.०० लक्ष.

ब) भोम दोणवली गांग्रई रस्त्यावरील प्रजिमा-२९ कि.मी. १०/८०० ते १२/०० मधील रस्त्याचे सुधारणा व डांबरीकरण करणे, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी रु.२५.०० लक्ष

सदर कामे पावसाळ्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडनदी प्रकल्प (जि.रत्नागिरी) राजिवली धरणाच्या डाव्या कालव्याचे काम सुरु करणेबाबत

**(४८) १२४२७ (०६-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री. मनोहर भोईर (उरण), श्री. संजय पोतनीस (कलिना), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडनदी प्रकल्प (जि.रत्नागिरी) राजिवली धरणाच्या डाव्या कालव्याचे काम सुरु करणेबाबत लाभक्षेत्रातील शेतक-यांकडून वारंवार मागणी करण्यात येत असूनही अद्याप काम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याचे काम होत नसल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतक-यांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, ही ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याचे काम सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :**(१) होय.
(२), (३) व (४) गडनदी प्रकल्पाचे उजव्या कालव्यावरील सा.क्र.१७/५०० येथील जलसेतू नंतर प्रकल्पाचा डावा कालवा निघतो. डाव्या कालव्यावर सिंचन होण्यासाठी प्रथम उजव्या कालव्यावरील जलसेतू पुर्ण होणे गरजेचे आहे. याबाबतची निविदा निश्चित करण्यात आली आहे. डावा कालवा २७ कि.मी. चा आहे. यापैकी कि.मी. १ ते ७ मधील कामे प्रगतीत आहेत. प्रथम उजब्या कालव्यावरील जलसेतूचे काम हाती घेण्यात येईल व त्यानंतर डाव्या कालव्याच्या उर्वरित कामास गती दिली जाईल.

---

**महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेबाबत**

**(४९) १२४२९ (०६-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थे अंतर्गत कनिष्ठ अभियंते व इतर कर्मचारी विविध पदांवर कंत्राटी तत्वावर कार्यरत असून सदर संस्थेअंतर्गत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनांचीही कामे केली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत कंत्राटी कर्मचा-यांना नियमित करणे, समान काम-समान वेतन या तत्वानुसार आस्थापनेवरील कर्मचा-यांप्रमाणे वेतन मिळणे, रजा मिळणे आदी मागण्यांचे निवेदन सिव्हिल इंजिनिअर्स वेल्फेअर असोसिएशन्सने शासनाला माहे. जाने. २०१५ वा त्या दरम्यान दिले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर कंत्राटी कामगारांच्या न्याय्य मागण्या मान्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :**(१) व (२) होय, खरे आहे.
(३) प्रधान मंत्री ग्राम सडक योजना ही कालबध्द स्वरुपाची योजना असल्याने प्रधान मंत्री ग्राम सडक योजेतंर्गतची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येतात. सदर पदे ही नियमित तत्वावर नसल्याने त्यांना नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांप्रमाणे वेतन रजा या सुविधा देता येणार नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सुमारे १०४ अंगणवाड्यांना स्वतःच्या हक्काची इमारत नसल्याबाबत

**(५०) १२४४१ (०८-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सुमारे १०४ अंगणवाड्यांना स्वतःच्या हक्काची इमारत नसल्याने येथील बालकांना खासगी घर अथवा मंदीरामध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडयांसाठी जागा उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील २८७ अंगणवाड्यापैकी १६२ अंगणवाड्यांना स्वतच्या इमारती आहेत. उर्वरित १२५ अंगणवाड्या खाली नमुद केलेल्या ठिकाणी भरत आहेत.

१) जि.प.शाळ - ५८ २) ग्रामपंचायत - ८
३) समाजमंदिर - १४ ४) देऊळ - ३
५) खाजगी घर - ४२

(२) अंगणवाड्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच यांना अंगणवाडी पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका यांचेद्वारे विनंती करण्यात आली आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.